# महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा) औरंगाबाद

## School Leadership Academy, Maharashtra

## मोड्यूल क्र.४५

### निसर्ग अभ्यास सहलीद्वारे विद्यार्थ्यांचे अध्ययन सहज होण्यासाठी शालेय नेतृत्वाची भूमिका

### The Role of School Leadership in facilitating students learning through Nature Study Trips

**प्रस्तावना -**

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात दर्जेदार शिक्षणाची अपेक्षा ठेवली आहे. विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा शालेय विषयाबरोबरच त्यांच्या भावनिक क्षेत्राशी संबंधित अभिरुची, अभिवृत्ती, नैतिक मूल्ये यांचाही विकास होणे अपेक्षित असते. निसर्ग आणि माणूस यांच्यात खूप जवळचा संबंध आहे. दोघेही एकमेकांना पूरक आहेत. निसर्ग हा मानवाचा सोबती तर आहेच पण तो एक महान गुरुही आहे. गुरुचे अस्तित्व अंधारात दिव्यासारखे असते.

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे<br>
पक्षीही सुस्वरे आळविती<br>
येणे सुख रुचे एकांताचा वास<br>
नाही गुणदोष अंगी येत

संत तुकाराम महाराज यांनी अशा सुंदर शब्दांत निसर्गाशी नाते सांगितले आहे. निसर्ग हा आपला सर्वात चांगला मित्र आहे जो आपल्याला येथे राहण्यासाठी सर्व संसाधने प्रदान करतो.

शाळेत वर्षभरात विविध प्रकारचे उपक्रम आयोजित केले जात असतात. कोरोना कालावधीत शाळा बंद होत्या, पण शिक्षण ऑनलाईन सुरु होते. राज्यस्तरावरून शाळा बंद पण शिक्षण आहे ही अभ्यासमाला दीक्षा ॲप वर सुरु करण्यात आली. शिक्षकांना घरातूनच विद्यार्थ्यांना अध्यापन करता यावे यासाठी गुगल क्लासरूमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. Whatsapp च्या माध्यमातून स्वाध्याय उपक्रम विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविण्यात आला. तथापि कोविड च्या जागतिक महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला.

- युनेस्कोने केलेल्या अभ्यासानुसार, भारतातील विद्यार्थ्यांचा शालेय शिक्षणाचा 65 % ते 74 % वेळ वाया गेला आहे.
- अझीझ प्रेमजी विद्यापीठाने सप्टेंबर 2020 मध्ये त्यांनी केलेल्या सर्वेक्षणानुसार , केवळ 42% मुले, ऑनलाईन वर्गाला उपस्थित राहू शकले .

- 80 % पेक्षा अधिक शिक्षकांना ऑनलाईन विद्यार्थ्यांबरोबर भावनात्मक संपर्क ठेवणे कठीण गेले व 90 % पेक्षा अधिक शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन परिणामकारकरित्या करणे अशक्य झाले.

कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर शाळा नियमितपणे सुरु झाल्या परंतु शिक्षकांपुढील आव्हाने मात्र काही कमी झाली नाहीत. त्यांना विद्यार्थ्यांचे अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी चाकोरी बाहेरील अध्ययनअनुभव देणे आवश्यक होते.

**मोड्यूल अध्ययनाची उद्दिष्टे :-**

1 ) शालेय शिक्षणात निसर्ग अभ्यास सहलीचे महत्त्व ही संकल्पना समजून घेणे.

2 ) शालेय शिक्षणात निसर्ग अभ्यास सहल राबवणाऱ्या शालेय नेतृत्त्वाचा अभ्यास करणे.

3 ) शालेय नेतृत्त्वासमोरील आव्हाने समजून घेऊन निसर्ग अभ्यास सहलीबाबत शालेय नेतृत्वाचा दृष्टीकोन विकसित करणे.

**निसर्ग अभ्यास सहल संकल्पना :-**

विद्यार्थ्यांच्या विकासात विविध सहशालेय उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावत असतात. त्यातीलच एक उपक्रम म्हणजे निसर्ग अभ्यास सहल होय. कोरोना प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षांमध्ये झालेले अध्ययन नुकसान भरून काढण्यासाठी आणि गुणवत्तेसाठी निश्चित करण्यात आलेली उदिष्टे साध्य करण्यासाठी निसर्ग अभ्यास सहल महत्वाच्या आणि उपयुक्त आहेत.

वर्षभर शालेय स्तरावर अभ्यासक्रमांतर्गत अनेक उपक्रम राबवविले जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सौंदर्यदृष्टी, वाचनाची गोडी, पुस्तकी ज्ञान, सामाजिक शिक्षण, आत्मबल, बौद्धिक विकास, हस्तकला विकास, आत्मविश्वास, सहकार्य भावना व व्यायामाचे महत्व यांचा विकास होण्यास मदत होते.तसेच विबिध विषयांच्या समवायातून शिकण्याबाबत उपयुक्ततेची प्रचीती दिसून येते.

These Elements must be incorporated taking into account the local and global needs of the country, and with a respect for and deference to its rich diversity and culture. Instilling knowledge of India and its varied social, culture, and technological needs, its inimitable artistic, language, and knowledge traditions, and its strong ethics in India's young people is considered critical for purposes of national pride, self-confidence, self-knowledge, cooperation, and integration. (NEP 2020, Page No. 4)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये देखील देशाच्या स्थानिक आणि जागतिक गरजा लक्षात घेऊन आणि समृद्ध विविधता आणि संस्कृतीचा आदर ठेवून हे घटक समाविष्ट केले पाहिजेत, असे सांगितले आहे. विद्यार्थ्यांना तसे अध्ययन अनुभव देण्याचे नियोजन आपणास करावयास हवे.

**निसर्ग अभ्यास सहलीद्वारे अनेक हेतू साध्य करता येतात**

- विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल आपुलकी व आवड निर्माण करता येते.
- जैवविविधता काय आहे व तिचे संरक्षण व संवर्धन करणे का गरजेचे आहे याची माहिती विद्यार्थ्यांना देता येते.

- विविध कृतींद्वारे विद्यार्थ्यांची पर्यावरणाच्या विविध घटकांशी शास्त्रशुद्ध ओळख व मैत्री निर्माण होते.
- विज्ञान, इतिहास व भूगोल आदी विषयांच्या पाठ्यघटकांबाबत प्रत्यक्ष अध्ययन अनुभव देता येतो.
- वर्तमानात व भविष्यात पर्यावरण व संरक्षण करण्याची वैयक्तिक व सामुदायिक जबाबदारी अंगी बाळगण्यास मदत होते.
- सर्जनशीलता, नवनिर्मिती क्षमता, सौंदर्यदृष्टी, पर्यावरण रक्षण, आधुनिकतेशी सांगड या मूल्यांच्या विकासात मदत होते.
- अध्ययन-अध्यापन प्रक्रियेतील निरसता व रटाळपणा कमी करून अध्ययन- अध्यापन प्रक्रिया आनंददायी होते.

शाळेमध्ये अध्यापन करीत असताना शिक्षकांना मुलांच्या अंगी असलेले कलागुण माहीती असतात. विद्यार्थ्यांच्या विकासात शिक्षकांची व मुख्याध्यापकांची भूमिका महत्वाची असते. निसर्ग अभ्यास सहलीद्वारे कोणते उपक्रम आपल्या वर्गासाठी व शाळेसाठी आवश्यक आहेत याची माहिती शिक्षक व मुख्याध्यापकांना असते. त्याप्रमाणे ते उपक्रमांचे नियोजन करीत असतात.

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. अशा उपक्रमांना आणि शाळांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील सर्व वरिष्ठ अधिव्याख्याता, अधिव्याख्याता भेटी देत असतात. आकाशवाणी अहमदनगरवर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा **भट्टीवाडी (करंजी),** ता. पाथर्डी येथील शिक्षक व विद्यार्थी यांची पक्षी निरीक्षण व निसर्ग अभ्यास सहल याविषयी मुलाखत ऐकली. सदर शाळेला आवर्जून भेट देऊन उपक्रमाची माहिती घेतली. सदर उपक्रमातून विद्यार्थ्यांना होणारा फायदा व शालेय नेतृत्वाचे कार्य सर्वांसमोर आणावे या हेतूने सदर मोड्यूल विकसित करण्यात आले.

निसर्ग अभ्यास सहल हा उपक्रम **श्री जयराम श्रीरंग सातपुते , प्राथमिक शिक्षक यांनी आपल्या शाळेत राबविला . त्यांना तो उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उपयोगी ठरला त्यामुळे अशा निसर्ग सहलींचे आयोजन अनेकदा शाळेत केले जाते ,याबाबतची यशोगाथा वाचून अधिक माहिती जाणून घेऊया.**

**यशोगाथा**
**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भट्टीवाडी (करंजी),**
**तालुका – पाथर्डी, जि. अहमदनगर**
**श्री जयराम श्रीरंग सातपुते,मुख्याध्यापक**

कोरोना कालावधीत सुमारे दीड वर्ष विद्यार्थी शालेय वातावरणापासून दूर होते. कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यानंतर शाळा नियमितपणे सुरु झाल्या. परंतु विद्यार्थी शालेय वातावरणात रमेनासे झाले होते. कारण विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ शाळेत थांबणे कंटाळवाणे वाटू लागले होते. लिखाणाची सवय देखील कमी झाली होती. अशा वेळी शिक्षकाची भूमिका खूप महत्त्वाची होती. विद्यार्थ्यांना शाळेत टिकून ठेवण्याबरोबरच विद्यार्थ्यांचा गुणवत्तापूर्ण विकास करणे देखील गरजेचे होते.

कोरोनाची लाट ओसरल्यानंतर पुन्हा एकदा मुलांच्या शाळा प्रत्यक्ष रूपाने सुरू झाल्या आहेत. सुमारे दीड वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर मुले पुन्हा एकदा शाळेच्या वातावरणाशी समायोजन करण्याचा प्रयत्न

करताहेत. मुलांना किती शिकवावे, काय शिकवावे, कसे शिकवावे असे एकच नव्हे तर कितीतरी प्रश्न सर्व शिक्षकांपुढे सध्या आहेत. मुलांची शाळेशी - शाळेतील औपचारीक अध्ययनाशी झालेली ताटातूट व स्वच्छंदी-जीवन जगण्याची लागलेली त्यांना सवय या दोहोंचाही विचार अध्यापनाचा प्रारंभ करताना प्रत्येक शिक्षक बांधवाने करणे आज खूप  गरजेचे आहे. मुलांची गाडी पुन्हा रूळावर येण्यासाठी काही काळ तर लागणार आहेच पण या काळातही विशेष प्रयत्न जाणीवपूर्वक व सातत्याने करणेसुद्धा तितकेच आवश्यक आहे. दीड वर्षानंतर मुले आपल्यासमोर आले म्हणून  त्यांच्यावर पुस्तकी शिक्षणाचा भडीमार करण्यापेक्षा ऑनलाईन शिक्षण व ऑफलाईन शिक्षण यात दुवा साधणाऱ्या उपक्रम व कृतींचा अंतर्भाव करणे आज नितांत गरजेचे आहे असे वाटते. त्यासाठी अध्यापनास सहशालेय उपक्रमाची जोड असणे आवश्यक असते.

कोरोना  आजाराबाबतच्या सर्व नियमांचे पालन करून व मुलांचे बालमानसशास्त्र जाणून घेऊन त्यासाठी असे काही वेगळे उपक्रमांचे आयोजन केले तर पुन्हा मुलांची औपचारीक शिक्षणातील गती वाढण्यास मदत होईल. त्यापैकीच ‘गप्पांचा तास’ हा अशाच प्रकारचा एक उपक्रम शाळेत राबविला. मुलांशी गप्पा मारताना त्यांच्या मनातील कित्येक आयाम समोर उलगडले गेले. मुलांची कौटुंबीक स्थिती व शिक्षण घेत असताना त्यांच्या अडचणी यांची ओळख शिक्षकाला या उपक्रमांमधुन होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या विचारांना अनौपचारीकपणे सुयोग्य दिशा देणे व ज्या मुलांसाठी काही विशेष प्रयत्नांची गरज असेल तर त्या गोष्टींचे नियोजन शिक्षक व मुख्याध्यापक यांना  करता येते हे आम्हाला गप्पांच्या तासात समजले.

माझ्या शाळेत मी दरवर्षी राबवत असलेला व ऑनलाईन व ऑफलाईन शिक्षणामधील उत्तम दुवा ठरू शकणारा एक महत्वाचा उपक्रम म्हणजे **‘निसर्गअभ्यास सहल’**. या उपक्रमामध्ये शनिवार सारखा एखादा दिवस पाहून सकाळच्या वेळी मुलांना चार भिंतींच्या बाहेर निसर्गात नेले जाते. मुलांना निसर्गाचे सजीव व निर्जीव घटक प्राणी, पक्षी, वनस्पती, जमीन, पाणी, हवा यांबद्दल माहीती दिली जाते. सजीव घटकांचे अन्नसाखळीतील स्थान त्यांचे संगोपन व संवर्धनाची आवश्यकता असे विज्ञानातील विविध पाठ्यघटक प्रत्यक्षरित्या मुलांना दाखवले जातात व शिकवले जातात.

हवा, पाणी, जमीन यांचे महत्व त्यांच्या प्रदुषणाचे कारणे व उपाययोजना यांची माहितीही मुलांना दिली जाते. भविष्यातील अशा समस्यांबद्दल त्यांच्यात जाणीवजागृती निर्माण केली जाते. आपल्या परिसरातील वनस्पतींची प्रत्यक्ष ओळख, औषधी वनस्पतींची माहिती याबरोबरच परिसरातील पक्षांची प्रत्यक्ष ओळख करून त्यांचे वर्गीकरण केले जाते. पक्षी ओळख करताना दुर्बिणीचा वापर कसा करावा, निरीक्षण केलेल्या पक्षांच्या नोंदी कशा ठेवाव्यात हे सुद्धा शिकवले जाते.

कोरोना काळात मुलांचा लिहिण्याचा सराव खूप कमी झाला होता. मुलांना वहीवर लिहीण्याचा प्रचंड कंटाळा असतो. त्यात दीर्घकाळानंतर  शाळेत रूजु झालेल्या मुलांची लेखनगती व मानसिकता कमी असल्याने दिसून आले.  वयोगटानुसार वर्गातील मुलांना परिसरातील खड्यांच्या व काड्यांच्या सहाय्याने स्वतःचे नाव, मित्र  मैत्रिणींची नावे, अंक, शब्दांचे स्पेलिंग लिहीण्यास सांगितले जाते ज्यातून लेखनाची प्रक्रिया नक्कीच आनंददायी होते असा अनुभव आम्ही घेतला आहे. कविता- गाणी यांवर विद्यार्थ्यांसोबत नृत्य करणे त्यांना गोष्टी सांगणे अशा उपक्रमांमुळेही गेल्या दीड -दोन वर्षात शिक्षक मुलांमध्ये निर्माण झालेली दरी कमी होण्यास मदत झाली आहे.

**निसर्ग अभ्यास सहलीची  उद्दिष्टे :-**

१)  विद्यार्थ्यांच्या अध्ययनात निसर्ग अभ्यास सहलीची गरज ओळखणे.

२)  विद्यार्थ्यांच्या निसर्ग अभ्यास सहलींचे आयोजन करणे.

३)   निसर्ग अभ्यास सहलिंमधून अध्ययन - अध्यापनात मनोरंजकता आणणे.

**वरील उद्दिष्टे समोर ठेवून निसर्ग अभ्यास सहल आयोजित करण्यात येते.**

**निसर्ग अभ्यास सहल उपक्रमाचे नियोजन / प्रत्यक्ष कार्यवाही :-**

- विषयाची निवड – परिसर अभ्यास / विज्ञान विषयातील घटकाची निवड करणे.
- कालावधी – निसर्ग अभ्यास सहलीचा कालावधी निश्चित करणे.
- तज्ञ मार्गदर्शक – विषयातील घटकाला अनुसरून तज्ञ मार्गदर्शक यांना आमंत्रित करणे.
- साहित्य – निसर्ग अभ्यास सहलीमध्ये घटकानुसार साहित्याची उपलब्धता करणे .उदा. पक्षी निरीक्षण आपणास करावयाचे असल्यास दुर्बिणींची आवश्यकता असते. त्यांची उपलब्धता आपणास विद्यार्थी संख्येनुसार करावी लागते.

**एका निसर्ग अभ्यास सहलीचे**
**नियोजन व वेळापत्रक दिवस - पहिला**

| अ.क्र | वेळ | तपशील | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| १ | स. ८.०० | शाळेत जमणे. उपस्थिती नोंद.<br>छायाचित्र प्रदर्शन (फुलपाखरू) | श्री जयराम सातपुते<br>श्री परमेश्वर भवर.<br>श्री संजय दळवी ,<br>(छायाचित्रकार) |
| २ | स.९.०० | प्रस्थान | |
| ३ | स. ९ ते ९.३० | रस्त्यावरील झाडांची माहिती, कीटक, फुलपाखरू ओळख | श्री.अमित गायकवाड<br>(वनस्पती अभ्यासक )<br>श्री प्रीतम ढगे,<br>कीटक अभ्यासक |
| ४ | स.९.३० ते १०.३० | तलावास भेट, पक्षी निरीक्षण –<br>ओळख व शास्त्रशुद्ध नोंदी | श्री जयराम सातपुते |
| ५ | स.१०.३० ते ११.३० | अल्पोपहार | |
| ६ | स.११.३० ते १.०० | गिर्यारोहण – भट्टीवाडी डोंगर | श्री सचिन अकोलकर<br>(स्थानिक गिर्यारोहक ) |
| ७ | दु.१ ते २.०० | शेतीपूरक व्यवसाय भेट –<br>पशुपालन , शेळीपालन | संध्या क्षेत्रे, आकाश क्षेत्रे ,संदीप क्षेत्रे |
| ८ | दु. २.०० ते २.३० | देशी गाई संवर्धन व<br>कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प भेट | श्री धनराज क्षेत्रे |
| ९ | दु.२.३० ते ३.०० | भोजन – शाळेकडे प्रस्थान | |

**दिवस दुसरा**

| अ.क्र | वेळ | तपशील | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| १ | स. ८.०० | शाळेत जमणे. उपस्थिती नोंद. पर्जन्यमापक प्रात्यक्षिक | श्री जयराम सातपुते<br>श्री परमेश्वर भवर व श्री शांतवन क्षेत्रे |
| २ | स.९.०० | प्रस्थान | |
| ३ | स. ९ ते ९.३० | सेंद्रिय शेती प्रकल्पास भेट | श्री शांतवन क्षेत्रे |
| ४ | स.९.३० ते १०.३० | सोशल सेंटरचे जलसंधारण, पाटबंधारे कामे | श्री परमेश्वर भवर व श्री शांतवन क्षेत्रे |
| ५ | स.१०.३० ते ११.३० | अल्पोपहार | |
| ६ | स.११.३० ते १.०० | जलतरण – पाटबंधाऱ्याचे जलतरणाचा आनंद | श्री जयराम सातपुते<br>श्री परमेश्वर भवर व<br>श्री सचिन अकोलकर |
| ७ | दु.१ ते २.०० | बायोगॅस निर्मिती प्रकल्प व ठिबक सिंचन, तुषार सिंचन | श्री मारुती क्षेत्रे |
| ८ | दु.२.३० ते ३.०० | भोजन – शाळेकडे प्रस्थान | |

- **प्रत्यक्ष कार्यवाही – ठरविलेल्या नियोजनानुसार निसर्ग अभ्यास सहलीचे आयोजन केले.**



**सहलीसाठी शाळेत एकत्र जमणे.**



**फुलपाखरू प्रदर्शन – श्री संजय दळवी,(छायाचित्रकार) यांचेकडून ओळख व माहिती घेताना विद्यार्थी**




**रस्त्यावरील झाडांची माहिती, कीटक, फुलपाखरू ओळख - श्री अमित गायकवाड, वनस्पतीअभ्यासक**




**तलावास भेट, पक्षी निरीक्षण ओळख व शास्त्रशुद्ध नोंदी- श्री जयराम सातपुते , मुख्याध्यापक (पक्षी अभ्यासक)**




**गिर्यारोहण – (भट्टीवाडी डोंगर)    श्री सचिन अकोलकर   (स्थानिक गिर्यारोहक )**




शेतीपूरक व्यवसाय भेट – पशुपालन , शेळीपालन




संध्या क्षेत्रे, आकाश क्षेत्रे ,संदीप क्षेत्रे




सेंद्रिय शेती माहिती देताना – श्री शांतवन क्षेत्रे




जलसंधारण व पाटबंधारे काम माहिती - श्री परमेश्वर भवर व श्री शांतवन क्षेत्रे




जलतरण – पाटबंधाऱ्याचे जलतरणाचा आनंद - श्री जयराम सातपुते, श्री परमेश्वर भवर, श्री सचिन अकोलकर




**शाळेकडे प्रस्थान**

**चिंतनात्मक प्रश्न --**

१. केवळ परिसर अभ्यास व विज्ञान याच विषयाचा अभ्यास करण्यासाठी निसर्ग अभ्यास सहली उपयुक्त ठरतात,यावर आपले मत थोडक्यात विशद करा.
२. मोठमोठ्या शहरात निसर्ग अभ्यास सहलींचे आयोजन करण्यासाठी कोणत्या अडचणी येऊ शकतात ? असे तुम्हाला वाटते.या अडचणींवर मात करण्यासाठी उपाययोजना सुचवा.

**निसर्ग अभ्यास सहल video लिंक :-**

https://fb.watch/hgDood3mQy/?mibextid=6aamW6

**आकाशवाणी अहमदनगर मुलाखत लिंक :-**

https://youtu.be/0gxscTDr_KQ
https://you.be/iNJ2L8R83gY

- **विद्यार्थ्यांमध्ये परिसर अभ्यास विषयात खालीलप्रमाणे संपादणूक दिसून आली.**
  **निसर्ग अभ्यास सहल राबविण्यापूर्वी विद्यार्थ्यांची परिसर अभ्यास या विषयातील पूर्व चाचणीद्वारे जाणून घेतली. त्यानंतर उपक्रम राबविल्यानंतर उत्तर चाचणी घेतली असता संपादणूकीमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले.**

| चाचणी/ संपादणूक | ज्ञानात्मक संपादणूक (टक्केवारी) | आकलनात्मक संपादणूक (टक्केवारी) |
|---|---|---|
| पूर्व चाचणी (विद्यार्थी संख्या 30 ) | 40 | 40.13 |
| उत्तर चाचणी (विद्यार्थी संख्या 30 ) | 90 | 96.66 |

**निसर्गअभ्यास सहलीचा मुले खूप आनंद घेतात त्यासोबतच खालील अनेक सकारात्मक बाबी दिसून आल्या ( फलनिष्पत्ती ) :-**

- विद्यार्थ्यांची उपस्थिती नियमितपणे वाढली.
- शाळेतील विद्यार्थ्यांचा अध्ययनात सहभाग वाढला.
- विद्यार्थी परिसर अभ्यास विषय कृतीतून , प्रत्यक्ष अनुभवातून शिकले.
- विद्यार्थ्यांमध्ये परिसराबद्दल आत्मीयता व आवड निर्माण झाली.
- विद्यार्थ्यांनी जैवविविधता काय आहे तिचे संवर्धन का महत्त्वाचे आहे हे समजून घेतले.
- विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांची पर्यावरणातील विविध घटकांशी वैज्ञानिक ओळख आणि मैत्री निर्माण झाली.
- अनौपचारिक शिक्षणामुळे विद्यार्थी, शाळा, शिक्षक व समाज यांच्यात परिसराबद्दल आपुलकी निर्माण होण्यास मदत झाली.
- सध्या व भविष्यात पर्यावरणाचे संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी वैयक्तिक आणि सामुदायिक जबाबदारी समजण्यास मदत झाली.
- विद्यार्थ्यांसाठी अध्ययन – अध्यापन प्रक्रिया निरस, कंटाळवाणी न राहता आनंददायी झाली.

**शालेय नेतृत्व व शिक्षकांच्या दृष्टीकोनातून मोड्यूलची उपयुक्तता -**

१) शालेय व्यवस्थापन – शाळेतील दैनंदिन कामकाज करताना विद्यार्थ्यांच्या आनंददायी शिक्षणात शालेय नेतृत्वाची महत्त्वाची भूमिका असते. अध्ययन- अध्यापन ते सहशालेय उपक्रम या सर्वांचे व्यवस्थापन करणे हे शालेय नेतृत्वाचे काम असते. या दृष्टीने निसर्ग अभ्यास सहल उपक्रमाचे व्यवस्थापन असे करावे हे या मोड्यूलद्वारे लक्षात येते .

२) शालेय आंतरक्रिया – शालेय कामकाजामध्ये मानवी घटकातील आंतरक्रिया नित्याचाच भाग आहे. प्रत्येक उपक्रमात मानवी आंतरक्रिया सुखद होण्यासाठीची माहिती मिळते .

३) प्रत्यक्ष अध्ययन अनुभव – शिक्षकांना अध्यापन करताना निसर्ग अभ्यास सहलीची मदत होते. निसर्गाच्या सानिध्यात मुलांना प्रत्यक्ष अनुभव दिल्याने मुलांच्या संकल्पना स्पष्ट होतात. तसेच मुलांचे शंका समाधान प्रत्यक्ष अनुभवातून करता येते.

४) निसर्ग सहलीचे आयोजन – शालेय उपक्रमामध्ये निसर्ग सहलीचे आयोजन कसे करावे ? कोणत्या घटकांसाठी कोणते ठिकाण निवडावे,या बाबत मार्गदर्शन या मोड्यूलमधून मिळते.

निसर्ग हा माणसाचा गुरु आहे .निसर्गाकडून निरपेक्ष पद्धतीने आपल्याला अगण्य गोष्टी सतत प्राप्त होतात.मात्र याच बाबीशालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना सांगितल्या,अनुभव दिले तर निश्चितपणे मुलांमध्ये निसर्गाबाबतचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होईल,यासाठी निसर्ग सहली मधून विद्यार्थ्यांना निसर्गाजवळ नेता येईल असे वाटते.

**संदर्भ साहित्य –**


- राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०.
- शालेय नेतृत्व विकास कार्यक्रम (SLDP) पूरक वाचन साहित्य , जानेवारी २०१८, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था, औरंगाबाद.
- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन. शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण 2021/प्र.क्र.179/एसडी-6 मुंबई- 400 032, दिनांक : 27 ऑक्टोबर, 2021.
- SARTHAQ Part 1, NEP IMPELTENTION PLAN , (2021) Department of School Education and Literacy Ministry Of Education, Government of INDIA.



| **मोड्यूल विकसक** | **समन्वयन** | **मार्गदर्शक** |
|---|---|---|
| श्री रामेश्वर लोटके | डॉ.ज्योती कुलकर्णी | श्री.रमाकांत काठमोरे |
| अधिव्याख्याता | समन्वयक | संचालक |
| जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहमदनगर | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद | महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा),औरंगाबाद |